"कायम विनाअनुदान" तत्वावर परवानगी दिलेल्या व "कायम" शब्द वगळण्यात आलेल्या (इंग्रजी माध्यम वगळून) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग/तुकडया अनुदानास पात्र घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : उमाशा-२०१६ /(१६१/१६) /२०१६)/एसएम-४,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा</u> :- (१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : माशाअ-२००९/(५९९/०९)/माशि-१, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११.
(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक संकीर्ण २०१२/(१५०/१२)/माशि-१, दिनांक १६ जुलै, २०१३.
(३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एचएससी-१८११/(४३१/११)/एसएम-३, दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४.
(४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक एचएससी-१८११/(४३१/११)/एसएम-३, दिनांक ४ जून, २०१४
(५) आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयाचे पत्र क्र. उच्च माध्य.२४३/मूल्यांकन १४-१५/१७/८८५६, दिनांक २२ डिसेंबर, २०१७ .
(६) आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयाचे पत्र क्र. उच्च माध्य.२४३/मूल्यांकन १४-१५/२०१८/२९, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८.

<u>प्रस्तावना</u> :-

राज्याची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन, दि. २४ नोव्हेंबर, २००१ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्यात नवीन शाळांना परवानगी देतांना **<u>"कायम विनाअनुदान</u>"** तत्वावर परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यापूर्वी देखील काही शाळांना "**<u>कायम विनाअनुदान</u>**" तत्वावर परवानगी देण्यात आलेली आहे. सदर शाळा भविष्यात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाहीत अशा आशयाचे हमीपत्र लिहून घेऊनच सदर शाळांना परवानगी देण्यात आली होती. तथापि, सदर शाळांना अनुदान लागू करण्याची मागणी सर्व संबंधित घटकांकडून व लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे करण्यात येत होती. सदर मागणी विचारात घेऊन, मंत्रीमंडळाच्या दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४ च्या बैठकीतील निर्णयानुसार "**<u>कायम विनाअनुदान</u>**" तत्वावर परवानगी दिलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचा (इंग्रजी माध्यम वगळून) **"कायम"** शब्द संदर्भाधीन क्र.(३) येथील दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये वगळण्यात आला.

२. संदर्भाधीन क्र. (४) येथील शासन निर्णय, दि.४ जून, २०१४ अन्वये राज्यातील "**कायम विनाअनुदान**" तत्वावर परवानगी दिलेल्या उच्च माध्यमिक शाळांना (इंग्रजी माध्यमाच्या शाळा वगळून) **अनुदान सूत्र** लागू करण्यासाठी **मुल्यांकनाचे निकष** विहित करण्यात आले.

३. मुल्यांकनाच्या दिनांक ४ जून, २०१४ च्या शासन निर्णयानुसार उच्च माध्यमिक शाळांचे ऑनलाईन प्रणालीद्वारे मुल्यांकन केलेले प्रस्ताव तसेच मुल्यांकनात आढळून आलेल्या त्रुटींची पूर्तता केलेले प्रस्ताव आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे स्तरावर तपासणी/छाननी करून संदर्भाधीन क्र. (५) येथील दिनांक २२ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला. या प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयास/अतिरिक्त शाखेस/अतिरिक्त तुकडीस शासन मान्यता आदेशाची व अन्य आवश्यक कागदपत्रांची सखोल छाननी करुन सुधारीत प्रस्ताव संदर्भाधीन क्र. (६) येथील दिनांक २२ फेबुवारी, २०१८ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. या सुधारीत प्रस्तावानुसार मुल्यांकनाचे निकष पूर्ण करणा-या उच्च माध्यमिक शाळांना अनुदानासाठी पात्र घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-:

शासन निर्णय, दिनांक ४ जून, २०१४ मधील विहित निकषांची व आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या सोबत जोडलेल्या (१) **"प्रपत्र-अ"** मध्ये नमूद केलेल्या "**कायम विनाअनुदान**" तत्वावर परवानगी दिलेल्या १२३ उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना आणि (२) **"प्रपत्र-ब"** मधील "**कायम विनाअनुदान**" तत्वावर परवानगी दिलेल्या २३ उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील त्यांच्यासमोर नमूद केल्यानुसार अतिरिक्त शाखा/तुकडयांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात येत आहे :-

अटी व शर्ती :-

१) "प्रपत्र-अ" व **"प्रपत्र-ब"** मध्ये नमूद केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर, २०११, दिनांक १६ जुलै, २०१३ व दिनांक ४ जून, २०१४ मधील सर्व निकष व अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. ज्या शाळांनी वरील अटींची पूर्तता केलेली नसेल, तरीही त्या शाळांचा प्रस्ताव अनुदानास पात्र घोषित करण्यासाठी शासनाकडे पाठविण्यात आला असेल, असे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिका-यांवर राहील.

२) सदर उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना शासनाकडून ज्या वर्षी प्रत्यक्ष अनुदान मंजूर करण्यात येईल, त्या वर्षीच्या **संचमान्यतेनुसार** मंजूर असलेली शिक्षक व शिक्षकेतर पदे अनुदानास पात्र राहतील.

३) या शासन निर्णयाद्वारे अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शाळांना खालील अटींची/कागदपत्रांची तपासणी व पूर्तता करण्याच्या अधीन राहून पात्र ठरविण्यात येत आहे :-

(३.१) उच्च माध्यमिक शाळा मूळ मान्यता दिलेल्या ठिकाणी/शासनाने स्थलांतरास मान्यता दिलेल्या ठिकाणी सुरु आहे,

(३.२) उच्च माध्यमिक शाळेचे हस्तांतर झाले असल्यास, हस्तांतरास शासन मान्यतेचे आदेश.

४) ज्या शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती "**बायोमेट्रिक**" प्रणाली द्वारे नोंदविण्यात येत आहे, अशाच शाळा अनुदानास पात्र राहतील.

५) ज्या शाळांमध्ये शेवटच्या वर्गातील विद्यार्थी पटसंख्या ३० पेक्षा कमी असेल तसेच डोंगराळ व दुर्गम भागातील शाळांमध्ये शेवटच्या वर्गातील विद्यार्थी पटसंख्या २० पेक्षा कमी असेल अशा शाळा अनुदानास पात्र राहणार नाहीत. या शाळा अनुदान पात्रतेच्या निकषांमध्ये बसत नसल्यामुळे अशा शाळा "**स्वयं-अर्थसहाय्यित**" शाळा समजण्यात येतील.

६) शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ मधील निकषांप्रमाणे शाळा जरी अनुदानास पात्र ठरत असली तरी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पद भरती संदर्भात **"आरक्षण धोरणाचे"** पालन केलेले नसेल अशा शाळांना अनुदान अनुज्ञेय राहणार नाही व अशा शाळा हया "**स्वयं-अर्थसहाय्यित**" शाळा समजण्यात येतील.

७) शाळेमधील सर्व शिक्षकांच्या आधारकार्डसह वैयक्तिक मान्यतेचे आदेश **"सरल"** प्रणालीत भरल्याशिवाय शाळा अनुदानास पात्र राहणार नाही.

८) सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना **"राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेत"** समाविष्ट होणे बंधनकारक राहील. अन्यथा शाळा अनुदानास पात्र राहणार नाही.

९) सदरहू शाळांमधील सध्या रिक्त असलेल्या व भविष्यात रिक्त होणाऱ्या पदांवरील शिक्षक भरती सेवाप्रवेश विषयक प्रचलित नियमानुसार करणे बंधनकारक राहील.

१०) सर्व शाळांचे जिल्हा शैक्षणिक प्रणालीवरील **(यु-डायस)** क्रमांक आणि संबंधित शाळेत शिकत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे **"आधारकार्ड"** असणे आवश्यक आहे. आधार क्रमांकाच्या आधारे विद्यार्थी संख्या ग्राहय धरण्यात येईल.

३. शैक्षणिक गुणवत्ता :- इयत्ता ११ वी व १२ वी च्या वर्गांचा निकाल कोणत्याही सलग ३ वर्षाचा विचार केल्यास किमान एका वर्षी १०० टक्के असावा. शाळेतील कोणत्याही वर्गासाठी वरील निकष प्राप्त करण्यात कोणतीही शाळा सलग तीन वर्षे अपयशी ठरल्यास शाळेची मान्यता काढून शाळा बंद करण्यात यावी व शाळेतील विद्यार्थ्यांना नजीकच्या शाळेमध्ये समायोजित करण्यात यावे.

४. <u>क्षेत्रिय कार्यालयाची जबाबदारी</u> :-

४.१ प्रत्यक्ष अनुदान वितरीत करण्यापूर्वी **"सरल"** प्रणालीनुसार सर्व माहितीची सत्यता पडताळणीची संयुक्तिक जबाबदारी संबंधित शिक्षणाधिकारी व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

४.२ या शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर पदे संचमान्यतेनुसार रिक्त असल्यास, शासकीय व खाजगी अनुदानित उच्च माध्यमिक शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना समायोजनाने सामावून घेणे बंधनकारक राहील.

५. <u>शासनाचा स्वेच्छाधिकार</u> :- :- शाळा अनुदानासाठी पात्र म्हणून घोषित झाली म्हणजे त्या शाळेस अनुदानाचा हक्क प्राप्त होत नाही. अनुदानास पात्र घोषित केलेल्या शाळांना अनुदान मंजूर करणे हा शासनाचा **"स्वेच्छाधिकार"** असून निधीच्या उपलब्धतेनुसार शासन निकषपात्र शाळांना अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेईल. सदर अनुदान हे भूतलक्षी प्रभावाने लागू केले जाणार नाही. तसेच, शाळांना विनाअनुदान तत्वावर कोणत्याही शैक्षणिक वर्षात मान्यता दिलेली असली तरी, राज्याची आर्थिक स्थिती, वेळोवेळी उपलब्ध होणारी आर्थिक संसाधने, राज्याच्या गरजा व त्यांचा प्राधान्यक्रम विचारात घेऊन, शासन अनुदानाच्या सूत्रात बदल करील व ज्या शाळांना अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही, त्या शाळांना जेव्हा अनुदान मंजूर करावयाचे असेल त्यावेळचे अनुदान सूत्र त्यांना लागू राहील.

६. प्रस्तावाच्या अनुषंगाने तपासणी/छाननीमध्ये अपात्र ठरलेल्या/कागदपत्रांची पूर्तता न केलेल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना, अपात्रतेची कारणे/ त्रुटींबाबत कळविण्याची कार्यवाही आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्या कार्यालयाने करावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०२२८१६५९५२५३२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2018.02.28 18:28:40 +05'30'

(स्वाती नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
२) सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
३) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी,

६) मा.प्रधान सचिव (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक,
७) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे,
८) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे-१,
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
१०) महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर,
११) महालेखापाल (स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा) महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर,
१२) स्थानिक निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१३) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१४) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सर्व जिल्हा परिषद,
१५) अधिक्षक, वेतन पथक (माध्यमिक), सर्व जिल्हा परिषद,
१६) निवडनस्ती - एसएम-४.

“प्रपत्र-अ”

" कायम विना अनुदान” तत्वावर परवानगी दिलेल्या उच्च माध्यमिक शाळा.

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : उमाशा-२०१६ /(१६१/२०१६)/एसएम-४,

दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१८ चे सहपत्र. (अनुक्रमांक १ ते १२३)

अ.क्र.	संस्थेचे व शाळेचे नांव	शाळेचे क्षेत्र बिगर आदि. टीएसपी/ ओटिएसपी/१०३ विकास गट	माध्यम	शाखा	अनुदानासाठी पात्र उच्च माध्यमिक शाळा
	जिल्हा - औरंगाबाद				
१	मानव विकास व पुर्नरक्षण संशोधन संस्था औरंगाबाद संचलित महाराष्ट्र क.म.विद्यालय, वाळूंज गंगापूर जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२	बंजारा जागृती संघ तांडा शिरसाळा संचलित, वसंतराव नाईक उच्च माध्यमिक , तांडा शिरसाळा, ता.सिल्लोड जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
३	सावित्रीबाई शिक्षण प्रसारक मंडळ पिशोर संचलित समता उच्च माध्यमिक विद्यालय, पिशोर ता.कन्नड जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
४	श्रीकृष्ण एज्युकेशन सोसायटी औरंगाबाद संचलित स्व.भैरोमल तनवाणी उच्च माध्यमिक विद्यालय, आयोध्यानगर, औरंगाबाद.	बिगर आदिवासी	मराठी	वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
५	कोहीनूर शिक्षण संस्था, संचलित कोहिनूर कला,वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, खुलताबाद जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६	जय कालिकादेवी शिक्षण प्रसारक संस्था सावळबारा ता.सोयगांव शिवाजी भवानी उच्च माध्यमिक विद्यालय, मोलखेडा, ता.सोयगांव जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
७	ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, बाजार सावंगी ता.खुल्ताबाद जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
८	कै.तेजरावजी पाटील बहु.शिक्षण संस्था संचलित कै. पुंडलिकराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मोहरा, ता.कन्नड जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
९	राष्ट्रीय चॅरीटेबल ट्रस्ट संचलित राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, जैतापूर ता. कन्नड जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१०	राष्ट्रीय चॅरीटेबल ट्रस्ट संचलित राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, नागद ता.कन्नड जि.औरंगाबाद.	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
११	जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालय, पिंपरखेडा ता.कन्नड जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम

१२	प्रेरणा सेवाभावी संस्था संचलित संत रामदास उच्च माध्यमिक विद्यालय, गिरणेर तांडा, ता. जि. औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१३	गणेश शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालय, तळणी, ता.सिल्लोड जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१४	सरस्वती बहु.शिक्षण संस्था शेळगांव संचलित, एच.पी.एल.उच्च माध्यमिक विद्यालय,कृष्णापूर, बिडकीन, ता.पैठण जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१५	अजिंक्य एज्युकेशन सोसायटी मुंबई संचलित राजर्षी शाहू महाराज उच्च माध्यमिक विद्यालय, सातारा परिसर, औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१६	कैलास क्रीडा मंडळ खुलताबाद संचलित देवी गिरीजामाता उच्च माध्यमिक विद्यालय, भडजी, ता.खुलताबाद, जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१७	भैरवनाथ शिक्षण क्रीडा समाजसेवा मंडळ अहमदनगर संचलित शिवछत्रपती कनिष्ठ महाविद्यालय, सुंदरवाडी, झाल्टा, ता.जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम, १२ वी प्रथम
१८	मानव विकास कल्याण प्रतिष्ठान संचलित, छत्रपती प्रिपेटरी ज्युनियर कॉलेज शहापूर बंजर ता.गंगापूर, जि.औरंगाबाद	बिगर आदिवासी	मराठी	वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
		जिल्हा बीड			
१९	आदर्श महाराष्ट्र सेवाभावी संस्था बीड संचलित नवीन स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय, मादलमोही ता.गेवराई जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२०	श्री.विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी (सा) संचलित विश्वनाथ कराड उच्च माध्यमिक विद्यालय केज, जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२१	श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी (सा) संचलित बाबुराव मुंडे उच्च माध्यमिक विद्यालय, देवगांव ता.केज, जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२२	श्री विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी (सा) संचलित बुवासाहेब पाटील उच्च माध्यमिक विद्यालय, सिंधी ता.केज जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२३	श्री.मच्छिंद्रनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, श्री निगमानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक, निमगांव (मा) ता.शिरुर जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२४	विर हनुमान शिक्षण संस्था सारणी (आ) संचलित पुरुषोत्तम दादा सोनावणे उच्च माध्यमिक विद्यालय, सारणी (आ) केज जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२५	श्री.भगवान बाबा सेवाभावी संस्था ताडसोन्ना संचलित स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, ताडसोन्ना ता.जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२६	स्वामी निर्मलनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, वांगी संचलित विश्वनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वांगी ता.जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम

		जिल्हा - जालना			
२७	शिवाजी एज्युकेशन सोसायटी नाव्हा संचलित रंगनाथ महाराज उच्च माध्यमिक विद्यालय, नाव्हा ता.जि.जालना	१०३ विकासगट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२८	ज्ञानराज शिक्षण प्रसारक मंडळ सावंगी टेकाळे संचलित जयभवानी उच्च माध्यमिक विद्यालय, देवळे गव्हाण, ता.जाफ्राबाद जि.जालना	१०३ विकासगट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान अति.शाखा	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२९	केशराबाई बहु.संस्था वडशेद संचलित केशराबाई कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, दानापूर ता.भोकरदन जि.जालना	१०३ विकासगट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
३०	दलितमित्र श्री भगवानराव पाटील संचलित सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालय, शेलूद ता.भोकरदन जि.जालना	१०३ विकासगट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
३१	मातृतीर्थ ग्रामीण विकास व बहु.संस्था सिंदखेडराजा संचलित जाणता राजा श्री छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय, अकोला देव, ता.जाफ्राबाद जि.जालना	१०३ विकासगट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
३२	छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन जि.जालना संचलित संत ज्ञानेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय, हसनाबाद ता.भोकरदन जि.जालना	१०३ विकासगट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
३३	दि.न्यु इंडिया मागासवर्गीय एज्युकेशन सोसायटी श्री. क्षेत्र आजुबाई प्रेसिडेंसी विज्ञान, वाणिज्य व कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, आन्वा ता.भोकरदन जि.जालना	१०३ विकास गट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
३४	श्री तिरुपती शिक्षण प्रसारक मंडळ जालना संचलित जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालय, पिरकल्याण ता.जि.जालना	१०३ विकास गट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
		जिल्हा -परभणी			
३५	ज्ञान संगोपन सेवाभावी संस्था जिंतूर संचलित छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय, सावंगी भाम्बले, ता.जिंतूर जि.परभणी	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
३६	कर्मभूमी सेवाभावी संस्था, रामपुरी बु.ता.मानवत संचलित भारत भारती उच्च माध्यमिक विद्यालय, दत्तधाम वसमत रोड, परभणी ता.जि.परभणी	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान अति.शाखा	११ वी प्रथम १२ वी प्रथम
३७	कर्मभूमी सेवाभावी संस्था, रामपुरी बु.ता.मानवत संचलित शरदचंद्रजी पवार क.म.वि. कोंद्री ता.गंगाखेड जि.परभणी	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
३८	संजय गांधी शिक्षण प्रसारक मंडळ काजळे (तांडा) ता.जिंतूर संचलित संत जनार्दन उ.मा.वि. चारठाणा, जिंतूर, जि.परभणी	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम, १२ वी प्रथम
३९	वाल्मिकी शिक्षण संस्था संचलित, श्रीमती शांताबाई नखाते उ.मा.वि. पाथरी जि.परभणी	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम, दुसरी १२ वी प्रथम,दुसरी
४०	श्री.छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण प्रसारक मंडळ सोनपेठ संचलित श्री.नृसिंह उ.मा.वि. नरवाडी, ता.सोनपेठ जि.परभणी	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम

	जिल्हा - हिंगोली				
४१	तुळजाई ग्रामीण विकास संस्था शेलवाडी ता.लोहा संचलित केंम्ब्रिज (स्व) कनिष्ठ महाविद्यालय, वसमत जि.हिंगोली	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
४२	नरहर कुरुंदकर शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दांडेगांव ता.कळमनूरी, जि.हिंगोली	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
४३	नरहर कुरुंदकर शिक्षण संस्था संचलित श्री रोकडेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पांगरा (शिंदे) ता.वसमत जि.हिंगोली	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
४४	अंबरेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नागेश्वर कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालय,औंढा नागनाथ ता.औंढा, जि.हिंगोली	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - लातूर				
४५	समाज जागृती शिक्षण संस्था मुरुड संचलित समाज जागृती उमावि, मुरुड ता.जि.लातूर	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
४६	किसान शिक्षण प्रसारक मंडळ, बोरगांव ता.जि.लातूर संचलित समता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जोडजवळा, ता.जि.लातूर	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
४७	किसान शिक्षण प्रसारक मंडळ, बोरगांव लातूर संचलित कर्मविर भाऊराव पाटील क.म.वि. बोरगांव ता.जि.लातूर	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - नांदेड				
४८	हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ बोरी संचलित श्री बालाजी उमावि बोरी खूर्द ता.कंधार जि.नांदेड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
४९	गोदावरी शिक्षण प्रसारक मंडळ सिंधी संचलित कृष्णा उच्च माध्यमिक विद्यालय, सिंधी ता.उमरी जि.नांदेड	ओटीएसपी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
५०	कै.रुक्मीणीबाई बहु.सेवाभावी संस्था,भोकर संचलित ज्ञानेश्वर उमावि, बोथडी ता.किनवट जि.नांदेड	आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
५१	स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ पेठवडस, ता.कंधार संचलित संत नामदेव महाराज कमवि पेठवडज ता.कंधार जि.नांदेड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
५२	कै.शिवाजीराजजी देशमुख प्रतिष्ठान संचलित, कै.शिवराजजी देशमुख कनिष्ठ महाविद्यालय, कौठा, ता.कंधार जि.नांदेड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - उस्मानाबाद				
५३	कै.अंबुमाता लोमटे शिक्षण संस्था सलगर संचलित कै.अबुमाता लोमटे कनिष्ठ महाविद्यालय, सलगरा (दी) ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम

	जिल्हा – वर्धा				
५४	ग्रामविकास शिक्षण संस्था, शिरपूर ता.देवळी जि.वर्धा संचलित जयविकास उमावि, शिरपूर (होरे), ता.देवळी जि.वर्धा	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा भंडारा				
५५	श्री.चक्रधर स्वामी शिक्षण संस्था खांब तालव भंडारा संचलित, प्रशांत कला कनिष्ठ महाविद्यालय,भागडी, ता.लाखांदूर जि.भंडारा	नक्षलग्रस्त	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा – गोंदिया				
५६	जयंत शिक्षण संस्था आमगांव संचलित पंचशिल हायस्कूल व ज्युनियर कॉलेज (विज्ञान व कला) मक्काटोला, ता.सालेकसा जि.गोंदिया	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
५७	आझाद शिक्षण संस्था बोंडगांव (सुरबन) संचलित स्व.हिरालालजी जैन (स्वा.सं.सै.) कनिष्ठ कला महाविद्यालय, खोबा/हलबी, ता.सडक अर्जूनी जि.गोंदिया	आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
५८	श्री.गुरुदेव आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ, गोंविदपूर संचलित गोदिया आदिलोक कनिष्ठ महाविद्यालय, बोळुदा जि.गोंदिया	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
५९	श्री. गुरुदेव आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ गोविंदपूर गोंदिया संचलित आदिलोक कनिष्ठ महाविद्यालय, गोरेगांव जि.गोंदिया	बिगर आदिवासी	हिंदी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६०	सुमैय्या एज्युकेशन सोसायटी वाशी नवी मुंबई संचलित एच ॲड टी कनिष्ठ महाविद्यालय, सडक अर्जूनी जि.गोंदिया	आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६१	विदर्भ एज्युकेशन सोसायटी कनेरी संचलित विदर्भ कमावि कनेरी/केशोरी ता.अर्जुनी मोरगांव जि.गोदिया	आदिवासी	हिंदी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६२	महीला जागृती शिक्षण संस्था बघोली संचलित सेजगांव उच्च माध्यमिक विद्यालय, सेजगांव ता.तिरोडा जि.गोंदिया	बिगर आदिवासी	मराठी इंग्रजी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६३	महिला जागृती शिक्षण संस्था बघोली संचलित गणेश उच्च माध्यमिक विद्यालय, धुमाधावडा ता.तिरोडा जि.गोंदिया	बिगर आदिवासी	मराठी इंग्रजी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६४	सार्वभौम सिध्दांत शिक्षण संस्था सालेकसा संचलित श्री.गुरुदेव कमावि दरेकसा ता.सालेकसा जि.गोंदिया	बिगर आदिवासी	हिंदी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६५	प्रतिक बहु. शिक्षण संस्था आमगांव संचलित श्रीनाथ कमवि आमगांव खूर्द जि.गोंदिया	बिगर आदिवासी	हिंदी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६६	स्व.श्रीमती लक्ष्मीबाई टेंभरे बहु.शिक्षण प्रसारक मंडळ चुटीया संचलित युवराजसिंह ज्युनियर कॉलेज चुटीया, ता.गोंदिया जि.गोंदिया	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६७	अंबिका बहु.शिक्षण संस्था सालेकसा संचलित गवराबाई कमावि झालीया ता.सालेकसा जि.गोंदिया	बिगर आदिवासी	हिंदी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
६८	नवयुवक लोधी क्षत्रीय संस्था गोंदिया संचलित स्वामी विवेकानंद उमावि सोनपूरी जि.गोंदिया	बिगर आदिवासी	हिंदी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम

६९	अंबिका बहु.शिक्षण संस्था सालेकसा संचलित नारायणभाऊ बहेकार उमावि लोहारा ता.सालेकासा जि.गोंदिया	आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा- चंद्रपूर				
७०	संत गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ सिन्देवाही संचलित संत गजानन महाराज उच्च माध्यमिक विद्यालय,पेंढरी मक्ता ता.सावली जि.चंद्रपूर	ओटीपीएस	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
७१	नागरी शिक्षण संस्था, नागरी संचलित नूतन नेहरु उच्च माध्यमिक विद्यालय, नागरी ता.वरोरा जि.चंद्रपूर.	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
७२	संत तुकाराम शिक्षण प्रसारक मंडळ चार्ली संचलित स्व.गोपाळराव वानखेडे क.म.वि.नांदगांव (पोडे) ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
७३	गोंडवन शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपूर संचलित मातोश्री उच्च माध्यमिक विद्यालय, तुकुंब जि.चंद्रपूर	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
७४	श्री.कृष्ण शिक्षण संस्था चंदनवाडी संचलित, प्रभाकरराव मामुलकर उच्च माध्यमिक विद्यालय, सोनापूर ता.राजूरा, जि.चंद्रपूर.	टिएसपी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा-गडचिरोली				
७५	गोंडवन विकास संस्था,नागभीड जि.चंद्रपूर संचलित उच्च माध्यमिक विद्यालय,अमिर्झा ता.जि.गडचिरोली	आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
७६	सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळ गडचिरोली संचलित कुथे पाटील कला व विज्ञान ज्युनियर कॉलेज, देसाईगंज, जि.गडचिरोली	आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - अमरावती				
७७	मदिहा अमरीन उर्दू शिक्षण संस्था अचलपूर जि.अमरावती संचलित सफा वा मारवा उर्दू कला ज्युनियर कॉलेज मुगलाईपूरा परतवाडा जि.अमरावती	बिगर आदिवासी	उर्दू	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
७८	भाग्यश्री शिक्षण संस्था अमरावती संचलित, भाग्यश्री उच्च माध्यमिक विद्यालय, सुरभी विहार अमरावती जि.अमरावती	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
७९	भाग्यश्री शिक्षण संस्था अमरावती संचलित बापूराव पाटील तुरखेडे उच्च माध्यमिक विद्यालय, असदपूर ता.अचलपूर जि.अमरावती.	बिगर आदिवासी	मराठी उर्दू	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - अकोला				
८०	अंजूमन अन्वारुल इस्लाम ट्रस्ट बाळापूर संचलित हुस्सामिय्या उर्दू ज्युनियर कॉलेज बाळापूर जि.अकोला	बिगर आदिवासी	उर्दू	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
८१	विदर्भ एज्युकेशन ॲड सोशल वेलफेअर पातूर संचलित हाजी मो.जाफर सिध्दीकी उर्दू ज्युनियर कॉलेज अकोली खदान अकोला	बिगर आदिवासी	उर्दू	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
८२	पुरोगामी विचार शिक्षण प्रसारक मंडळ अकोला संचलित गाडगेमहाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, दहीगांव गावंडे जि.अकोला	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम

८३	शमीम आझाद एज्युकेशन सोसायटी गिरोली वाशिम संचलित प्रा.जावेदखान ज्युनियर उर्दू कॉ.ऑफ आर्ट सायन्स महान जि.अकोला	बिगर आदिवासी	उर्दू	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
८४	सतीमाता शैक्षणिक बहु.क्रीडा मंडळ अजनी जि.अकोला संचलित मनोहर नाईक कला विज्ञान कमवि, महान जि.अकोला	बिगर आदिवासी	मराठी इंग्रजी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				कला अति.शाखा	११ वी प्रथम १२ वी प्रथम
८५	अमरीन उर्दू मायनोरीटी एज्युकेशन सोसायटी अकोला संचलित आमरीन उर्दू उच्च माध्यमिक विद्यालय, शिलोडा, जि.अकोला	बिगर आदिवासी	उर्दू	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
८६	संत गाडगेबाबा ग्राम विकास संस्था संचलित स्व.यमुनाताई वानखेडे कनिष्ठ महाविद्यालय, भंडारा जि.अकोला	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
८७	त्रंबकराव डवले बहु.शिक्षण प्र.जि.अकोला संचलित त्र्यंबकराव डवले कनिष्ठ महाविद्यालय, मोठी उमरी जि.अकोला	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
८८	युनिव्हर्सल सोशल वेलफेअर ॲड एज्युकेशन सोसायटी संचलित इकरा उर्दू उच्च माध्यमिक विद्यालय, अकोट जि.अकोला	बिगर आदिवासी	उर्दू	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
८९	वृंदावन शिक्षण संस्था चोहट्ट बाजार ता.अकोट संचलित श्री.संत तुकाराम महाराज कनिष्ठ महाविद्यालय, किनखेड पुर्णा ता.अकोट जि.अकोला	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा -वाशिम				
९०	श्री.गजानन महाराज शिक्षण संस्था हिवरा तांदळी जि.वाशिम संचलित डॉ.पंजाबराव देशमुख कमवि तांदळी हिवरा ता.जि.वाशिम	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
९१	राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ रिसोड संचलित संत तुकाराम माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय कंकरवाडी जि.वाशिम	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
९२	जय बजरंग बहु. सर्वागीन ग्रामीण विकास मंडळ कंजरा संचलित मुरलीभाऊ इंगोले कला कमवि कंजरा ता.मंगरुपीर जि.वाशीम	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
९३	अलहिलाल अल्पसंख्याक समाजकल्याण शिक्षण संस्था रिसोड संचलित डॉ.अल्लमा ईकबाल उर्दू उच्च माध्यमिक शाळा ता.रिसोड जि.वाशिम	बिगर आदिवासी	उर्दू	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
९४	श्री.संत पांडूरंग महाराज शिक्षण संस्था वाशीम नामदेवराव राजगुरु विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, धुमका बोराळा ता.जि.वाशिम	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - बुलडाणा				
९५	अलफलाह मल्टीपर्पज एज्युकेशन ॲड वेलफेअर सोसायटी अमडापूर संचलित सर सय्यद अहमद खान उर्दू निष्ठा महाविद्यालय, अमडापूर ता.चिखली जि.बुलडाणा	बिगर आदिवासी	उर्दू	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
९६	शिवगंगा बहु.शैक्षणीक संस्था रामनगर जालना संचलित आदर्श वाणिज्य,विज्ञान,कनिष्ठ महाविद्यालय,सिनागांव जहॉ.ता.देऊळगांव राजा जि.बुलडाणा.	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम

९७	डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज सुधार मंडळ राहेरी बु.संचलित जीवन विकास उच्च माध्यमिक विद्यालय, साठेगांव ता.सिंधखेड राजा,जि.बुलडाणा	१०३ विकास गट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
९८	उर्दू एज्युकेशन सोसायटी बडनेर भोलजी डॉ.नफिसुल आजीमखान उर्दू कनिष्ठ महाविद्यालय, वडनेर भोलजी ता.नांदुरा जि.बुलडाणा	बिगर आदिवासी	उर्दू	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
९९	श्री.बाबुजी शिक्षण क्रीडा युवा व व्यायाम प्रसारक मंडळ अकोला संचलित महात्मा ज्योतीबा फुले कनिष्ठ महाविद्यालय,खामगांव जि.बुलडाणा	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
			इंग्रजी	विज्ञान अति.शाखा	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१००	कै.महादेवराव आळशी सामाजिक संस्था संचलित महालक्ष्मी कनिष्ठ महाविद्यालय,माळरगांव ता.शेगांव जि.बुलडाणा	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - नाशिक				
१०१	जनलक्ष्मी आदिवासी शिक्षण संस्था बा-हे संचलित स्वामी विवेकानंद उच्च माध्यमिक विद्यालय, बा-हे ता.सुरगाणा जि.नाशिक	अतिदूर्गम आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१०२	गोदा युनियन धर्मदाय संस्था नायगांव संचलित टी.एस.दिघोळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, नायगांव ता.सिन्नर जि.नाशिक	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - धुळे				
१०३	मुस्लिम सोशल वेलफेअर ट्रस्ट धुळे संचलित नुरउर्दू हायस्कूल व ज्यु.कॉलेज ऑफ आर्टस गरीब नवाज नगर, अलहेरा कॉलनी, धुळे	बिगर आदिवासी	उर्दू	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - जळगांव				
१०४	पंकज शैक्षणिक व सामाजिक संस्था बोरोलेनगर चोपडा संचलित पंकज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बोरोलेनगर, चोपडा जि.जळगांव	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१०५	श्री.वासुदेव बाबा आध्यात्मिक व शैक्षणिक ट्रस्ट धुळे संचलित श्री समर्थ रघुनाथ बाबा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चुंचाळे ता.यावल जि.जळगांव	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१०६	श्री.रामसिता शिक्षण प्रसारक मंडळ कासमपूरा संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कासमपुरा, ता.पाचोरा जि.जळगांव	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी पहिली १२ वी पहिली
	जिल्हा - नंदुरबार				
१०७	श्री.साईबाबा भक्त मंडळ संचलित प.पु.सती गोदावरी माता माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय, म्हसावद, ता.शहादा जि.नंदुरबार	आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
	जिल्हा - पुणे				
१०८	मराठवाडा मित्र मंडळ डेक्कन जिमखाना पुणे संचलित मराठवाडा मित्र मंडळाचे वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, थेरगांव पुणे.	बिगर आदिवासी	मराठी	वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१०९	शिवभूमी शिक्षण प्रसारक मंडळ खेड शिवापूर संचलित शिवभूमी कनिष्ठ महाविद्यालय, यमुनानगर निगडी पुणे.	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम

११०	शिवभूमी शिक्षण प्रसारक मंडळ खेड शिवापूर संचलित शिवभूमी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खेड शिवापूर ता.हवेली जि.पुणे.	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
जिल्हा – सोलापूर					
१११	लक्ष्मणराव येडगे शिक्षण प्रसारक मंडळ ह.ल.दहिवडी संचलित ह.ल.दहिवडी विद्यालय व ज्युनियर कॉलेज ता.सांगोला जि.सोलापूर.	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
जिल्हा – कोल्हापूर					
११२	श्री. वारणा एज्युकेशन सोसायटी, सागाव, ता.शिराळा जि.सांगली संचलित श्री.बालदास महाराज माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरगांव ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर.	१०३ विकास गट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
११३	श्री.डी.ए.मणेरे चॅरिटेबल ट्रस्ट इंचलकरंजी संचलित मणेरे हाय व ज्युनि.कॉलेज इचलकरंजी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
११४	जनता शिक्षण प्रसारक मंडळ हूपरी संचलित जनता माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय हूपरी ता.हातकणंगले जि.कोल्हापूर.	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
११५	श्री.व्यंकनाथ शिक्षण प्रसारक मंडळ सोळांकुर संचलित श्री.यशवंतराव पाटील माध्यमिक विद्यालय व ज्यु.कॉलेज सोळांकुर, ता.राधानगरी जि.कोल्हापूर	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
११६	आजरा महाल शिक्षण मंडळ, आजरा संचलित व्यंकटराव हायस्कूल व ज्यु.कॉलेज आजरा, जि.कोल्हापूर	डोंगरी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
११७	ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक मंडळ मिणचे, संचलित स्वा.सैनिक एम.जी.पाटील आदर्श विद्यानिकेतन व ज्युनियर कॉलेज मिणचे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर.	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
११८	आदर्श गुरुकुल ॲकाडमी मिणचे, संचलित, गुरुकुल विद्यालय व ज्यु.कॉलेज पेठवडगांव, ता.हातकणंगले जि.कोल्हापूर.	बिगर आदिवासी	मराठी	वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
जिल्हा – सांगली					
११९	श्री.वारणा एज्युकेशन सोसायटी, सागाव ता.शिराळा जि.सांगली संचलित श्री.पी.डी.पवार कनिष्ठ महाविद्यालय, कणदूर पुनवत, ता.शिराळा जि.सांगली	डोंगरी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१२०	श्री.निलांबीका बसवेश्वर शिक्षण संस्था, संख ता.जत संचलित राजारामबापू पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला संख ता.जत जि.सांगली	१०३ विकास गट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१२१	दरीबडची विद्यावर्धक मंडळ, दरीबडची संचलित श्री.भैरवनाथ हायस्कूल ॲड ज्युनियर कॉलेज दरीबडची, ता.जत जि.सांगली	१०३ विकास गट	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम

जिल्हा - रत्नागिरी					
१२२	लोकमान्य शिक्षण संस्था सापुच तळे संचलित कै.रा.सी.बेर्डे माध्यमिक व उच्च माध्यमिक, सापुचे तळे ता.लांजा, जि.रत्नागिरी	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१२३	साटवली पंचक्रोशी शिक्षण संस्था, साटवली संचलित रा.सि.बेर्डे माध्यमिक विद्यालय व ज्युनियर कॉलेज साटवली, ता.लांजा जि.रत्नागिरी	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम

****

“प्रपत्र-ब”

" उच्च माध्यमिक शाळांच्या पात्र अतिरिक्त शाखा/तुकडया अनुदानास पात्र घोषित करणेबाबत."
शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : उमाशा-२०१६ /(१६१ /२०१६)/एसएम-४,
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१८ चे सहपत्र. (अनुक्रमांक १ ते २३)

अ. क्र.	संस्थेचे व शाळेचे नांव	शाळेचे क्षेत्र बिगर आदि. टीएसपी/ ओटिएसपी/१०३ विकास गट	माध्यम	शाखा	अनुदानासाठी पात्र अतिरिक्त शाखा/तुकडी
	जिल्हा - बीड				
१	जनता वसतिगृह धानोरा संस्था, धानोरा ता.आष्टी संचलित जनता उच्च माध्यमिक विद्यालय, धानोरा ता.आष्टी, जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी दुसरी, तिसरी, चौथी १२ वी दुसरी, तिसरी, चौथी
				संयुक्त	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२	श्री.विठ्ठलगड शिक्षण प्रसारक मंडळसारणी (सा.)संचलित श्री.विठ्ठल उच्च माध्यमिक विद्यालय सारणी (सा.) ता.केज, जि.बीड	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी दुसरी १२ वी दुसरी
	जिल्हा - रायगड				
३	तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे तळा संचलित कला, विज्ञान व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय, तळा, जि.रायगड	बिगर आदिवासी	मराठी	संयुक्त	११ वी दुसरी १२ वी दुसरी
	जिल्हा - जळगांव				
४	धनदाई माता एज्युकेशन सोसायटी मोहाडी (प्र.डांगरी) संचलित जय योगेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ढेकु सिमरोड, अमळनेर जि.जळगांव	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी दुसरी १२ वी दुसरी
				विज्ञान अतिरिक्त	११ वी प्रथम १२ वी प्रथम
५.	श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कै.नारखेडे विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, भुसावळ हिंदु हौसिंग सोसायटी यावल रोड, भुसावळ, जि.जळगांव	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी दुसरी १२ वी दुसरी
६.	तापी एज्युकेशन सोसायटी भुसावळ संचलित कला,विज्ञान आणि पु.ओ.नाहटा वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय जामनेर रोड, भुसावळ, जि.जळगांव	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी चौथी १२ वी चौथी
७	ब.ग.ट्रस्ट अडावद ता.चोपडा संचलित स्वा.सै.पं.धं.थेपडे माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय, म्हसावद, जि.जळगांव	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी दुसरी १२ वी दुसरी
८	महात्मा गांधी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित आर्टस सायन्स ॲड कॉमर्स कॉलेज यावल रोड, चोपडा जि.जळगांव	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी तिसरी १२ वी तिसरी
	जिल्हा - नंदुरबार				
९	शहादा ता.को.ऑफ एज्युकेशन सोसायटी शहादा संचलित कै. सो. जी. एफ. पाटील कनिष्ठ महाविद्यालय, शहादा जि.नंदुरबार.	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	इयत्ता ११ वी सहावी,सातवी, इयत्ता १२ वी सहावी,सातवी,
	जिल्हा - पुणे				
१०	चंद्रकांत यशवंत दांगट पाटील शिक्षण व क्रीडा संस्था संचलित, शिवछत्रपती कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालय, वडगांव बु.जि.पुणे	बिगर आदिवासी	मराठी	वाणिज्य	११ वी प्रथम,दुसरी १२ वी प्रथम,दुसरी

जिल्हा - सोलापूर					
११	नेताजी शिक्षण प्रसारक मंडळ इश्वर वाठार संचलित, वामनराव माने प्रशाला व कला,शास्त्र कनिष्ठ महाविद्यालय,नारायण चिंचोली ता.पंढरपूर जि.सोलापूर	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
जिल्हा -कोल्हापूर					
१२	विद्या प्रसारक मंडळ गडहिंग्लज संचलित, जागृती हायस्कूल व रावसाहेब आण्णा कित्तूरकर ज्युनियर कॉलेज, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.	बिगर आदिवासी	मराठी	संयुक्त	११ वी दुसरी १२ वी दुसरी
१३	बाहूबली विद्यापीठ बाहुबली ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर संचलित एम.जी.शहा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, बाहुबली ता.हातगणंगले	बिगर आदिवासी	मराठी	वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१४	दि.कागल एज्युकेशन सोसायटी कागल संचलित डी.आर.माने महाविद्यालय, (जुनियर कॉलेज) कागल, जि.कोल्हापूर.	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी दुसरी १२ वी दुसरी
जिल्हा - सांगली					
१५	श्री.शिवलिंगेश्वर शिक्षण संस्था संख ता.जत संचलित श्री.गुरूबसव विद्यामंदीर व ज्यु.कॉलेज संख ता.जत, जि.सांगली	१०३ विकास गट	कन्नड/ मराठी	विज्ञान	११ वी दुसरी १२ वी दुसरी
जिल्हा - सातारा					
१६	ग्रामीण विकास शिक्षण संस्था उंडाळे, ता.कराड जि.सातारा संचलित स्वा. दादासाहेब उंडाळकर उच्च माध्यमिक विद्यालय, उंडाळे ता.कराड जि.सातारा.	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी दुसरी १२ वी दुसरी
जिल्हा - रत्नागिरी					
१७	न्यू एज्युकेशन सोसायटी लांजा संचलित न्यू इंग्लिश स्कूल व तु.पं.शेटये कनिष्ठ महाविद्यालय, लांजा, ता.लांजा, जि.रत्नागिरी	बिगर अदिवासी	मराठी	वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
१८	मराठा मंदिर विद्यावर्धिनी मुंबई संचलित मराठा मंदिर न्यू इंग्लिश हायस्कूल एन्ड ज्यु कॉलेज पाली, ता.जि.रत्नागिरी	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
				संयुक्त	११ वी दुसरी १२ वी दुसरी
१९	संगमेश्वर एज्युकेशन सोसायटी कसबा संगमेश्वर संचलित न्यु इंग्लिश स्कूल एन्ड ज्यु कॉलेज कसबा संगमेश्वर ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी	बिगर आदिवासी	मराठी	विज्ञान	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२०	सहजीवन शिक्षण संस्था खेड ता.खेड, जि.रत्नागिरी संचलित श्रीमान चंदुलाल शेट ज्यु.कॉलेज खेड ता.खेड, जि.रत्नागिरी	बिगर आदिवासी	मराठी	वाणिज्य	११ वी प्रथम १२ वी प्रथम
२१	माखजन पंचक्रोषी शिक्षण प्रसारक मंडळ (सारंद) संचलित ॲडपी.आार.नामजोशी कला वाणिज्य उच्च माध्यमिक विद्यालय माखजन ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी	बिगर आदिवासी	मराठी	संयुक्त	११ वी दुसरी १२ वी दुसरी
२२	राजापूर शिक्षण प्रसारक मंडळ राजापूर संचलित गोडे दाते कला,वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, राजापूर. जि.रत्नागिरी	बिगर आदिवासी	मराठी	कला	११ वी दुसरी १२ वी दुसरी
२३	ओणी पंचक्रोशी शिक्षण मंडळ ता.राजापूर जि.रत्नागिरी संचलित नुतन विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, ओणी ता.राजापूर जि.रत्नागिरी	बिगर आदिवासी	मराठी	संयुक्त	११ वी दुसरी १२ वी दुसरी

****